नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०३/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## पोस्टे कुही हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार सा. नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर आळा घालणेकामी उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असता पोस्टे कुही हद्दीत पारधी बेडा वडद येथे अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैधरीत्या चालू असलेल्या मोहाफुल दारू भट्टीवर रेड करून दारू गाळणारे ०३ पुरूष व ०१ महिला हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून १) ३४०० लिटर रसायन सडवा किंमती ६८०००/—रू. २) मोहाफूल दारू १४० लिटर किमती ७०००/— रुपये ३) ड्रम व इतर साहित्य किंमती ११५००/—रू. असा एकूण ८६५००/—रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. ०१ महिला व ०३ पुरूष **आरोपी नामे—१) जितेंद्र रसावन पवार, वय ४० वर्ष, रा. पारधी बेडा वडद २) रवी ज्ञानेश्वर पवार, वय ३२ वर्ष, रा. वडद ३) रवींद्र मोरेश्वर पवार, वय ३८ वर्ष, रा. वडद** यांचे विरुद्ध पो.स्टे कुही येथे कलम ६५ (एफ), (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, बट्टुलाल पांडे, पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, राजू रेवतकर, मिलिंद नांदुरकर, मयूर ढेकले, किशोर वानखेडे, आशिष मुंगळे, विनोद काळे, इक्बाल शेख, ज्ञानेश्वर राऊत, संजय बरोदिया, नितेश पिपळोदे, शंकर मडावी, मपोहवा नीतू रामटेके, कविता बचले, पोलीस अंमलदार राकेश तालेवार, अभिषेक देशमुख, चालक पोहवा अमोल कुथे, शुक्ला, सुमित बांगडे यांनी पार पाडली.

# नागपूर ग्रामीण पोलीसांचा आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ तसेच सण व उत्सव संबंधाने रूट मार्च

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक– २०२४ ही शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी तसेच आगामी सन उत्सव छत्रपती शिवजयंती (तिथीनुसार), होळी, धुलिवंदन, गुड फ्रायडे, इस्टर संडे हे सन शांततेत पार पडावे या करिता पोलीस स्टेशन जलालखेडा स्तरावरून रूट मार्च चे आयोजन करण्यात आले होते दरम्यान पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत काल दिनांक १९/०३/२०२४ रोजीचे १६/३० ते २०/०० वा. पर्यंत जलालखेडा टाऊन, लोहारी सावंगा, भिष्णूर येथे रूटमार्च घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान सपोनी सी. बी. चौहान, ठाणेदार यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरिक्षक विपीन रामटेके साहेब, तसेच अंमलदार १० व १६ होम सैनिक, रेल्वे पोलीस फोर्सचे ०१ अधिकारी २० कर्मचारी असे एकूण ०३ अधिकारी, ३० पोलिस अंमलदार व १६ होम सैनिक रूट मार्च करिता हजर होते.

सदरची रूटमार्च कार्यवाही मा. श्री. हर्ष. ए. पोद्दार (पोलीस अधिक्षक सा. (नागपूर ग्रा), मा. अपर पोलीस अधिक्षक सा. मा. उपविभागीय पोलीस अधि. सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि/सी.बी. चौहान व त्यांच्या पथकाने केली.





## नागपूर ग्रामीण पोलीसांची महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची वाहतूक करणाऱ्या आरोपींना अटक

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद हद्दीत स्टॉफसह पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौजा खुर्सापार चेकपोस्ट, (बिहाडा फाटा) खापा नरसाळा शिवार NH-47 वर येथे मा. पोलीस अधिक्षक, नागपुर (ग्रामीण) यांचे आदेशाने चालु असलेल्या नाकाबंदी मधील स्टाफसह मौजा खुर्सापार चेकपोस्ट, (बिहाडा फाटा) खापा नरसाळा शिवार NH-47 येथे नाकाबंदी करीत असताना दिनांक २०/०३/२०२४ चे १३/०० वाजता दरम्यान MR RAI ट्रॅव्हल्स क्र. MH-14 CW-4647 ही येतांना दिसली सदर ट्रॅव्हल्स नाकाबंदीचे ठिकाणी थांबवुन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव गणेशसिंग अमरसिंग कमोजसिंग, वय ५४ वर्ष, रा. कॅपिटल ऑफिस जवळ, छोला रोड, हुजुर भोपाल तह. जि. भोपाल (एम.पी) व ट्रॅव्हल्सचे वाहकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव सुखराम सुरेश मोंगरे वय ४२ वर्ष रा. लोहारिया तह. जि. बैतुल (एम. पी) असे सांगितले व सदर ट्रॅव्हल्सचे डिक्कीची पाहणी केली असता ट्रॅव्हल्सच्या डिक्कीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतीबंधीत सुगंधीत तबांखु १) २०० ग्रॅमचे मजा १०८ हुक्का – शिशा तंम्बाखुचे ८० डब्बे प्रत्येकी ९३५/–रू. चे प्रमाणे एकुण ७४८००/– रुपये, २) ९६ ग्रॅमचे पान पराग प्रिमियम पान मसाला चे १०० पॉकेट प्रत्येकी १२८/– रुपये प्रमाणे एकुण १२,८००/– रुपये, ३) ४०० ग्रॅमचे ईगल हुक्का– शिशा तंम्बाकु झेनचे २० पॉकेट प्रत्येकी किंमती ६४०/– रुपये प्रमाणे एकुण १२,८००/– रुपये असा एकुण किंमत– १,००,४००/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल कोणाचा आहे याची चौकशी केली असता ट्रॅव्हल्स मधील प्रवासी नामे– **१) कमल हसम छवारे वय ४२ वर्ष रा. इंदिरा नगर, नगरधन तह. रामटेक जि. नागपुर, २) इमरान मजिद शेख वय २८ वर्ष रा. महात्मा गांधी रोड, गांधी वार्ड, भंडारा जि. भंडारा** यांचा माल असल्याचे निश्पन्न झाल्याने सदर सुगंधीत तबांखु हा महाराष्ट्र राज्यात वाहतुक व विक्री करण्यास प्रतीबंध असल्याने सदर ट्रॅव्हल्स मध्ये असलेला सुगंधीत तंबाखु अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य नागपूर विभाग नागपूर यांना माहीती देवुन त्यांच्या मार्फत पुढील कार्यवाही करण्यात आली.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर, पोलीस अंमलदार धोंडूतत्या देवकाते, पोलीस हवालदार दिनेश काकडे, पोलीस नायक दिपक इंगळे, चालक सहायक फौजदार गुणेश्वर डाखोले यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर